Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0023

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# आद्य समाजक्रांतीकारक - महात्मा ज्योतीबा फुले

**डॉ. विलास आत्माराम देऊलकर**
सहयोगी प्राध्यापक
बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला
जिल्हा - सिंधुदुर्ग पिन नं. ४१६ ५१६
इमेल - vadewoolkar@gmail.com\

सारांश -

महात्मा जोतीराव फुले या आद्य भारतीय समाज क्रांतिकारकाने सामाजिक सुधारणाबाबत क्रांतिकारक विचार मांडले. त्यांचा पिंड हा कृतीशील क्रांतिकारकाचा होता. सामान्य माणसाला नवयुगाची ग्वाही देणारा भारतातला पहिला समाज क्रांतिकारक म्हणजे महात्मा फुले हेच होत. एक सामाजिक विचारवंत, समाजसुधारक आणि आद्य लोकशिक्षक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

मुख्य शब्द - आद्य समाजक्रांतीकारक, महात्मा जोतीराव फुले, भारतीय समाज

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचा पहिला उद्रेक महात्मा जोतीराव फुले यांच्या रुपाने झाला. समाजाच्या सर्व थरातील हीनदीनांच्या उद्धाराची उत्कट तळमळ त्यासाठी कोणताही धोका पत्करण्याची आणि त्याग करण्याची तयारी व बोलल्याप्रमाणे वागण्याचे धारिष्ट्य या असामान्य गुणांमुळे महाराष्ट्राच्या इतिहासातील त्यांचे स्थान अढळ आहे. दलितांचे आक्रंदन आणि शोषीतांचे विलाप यासाठीच जोतिबांनी जीवनभर अश्रू ढाळले. जीवन यज्ञ आरंभीला.

पेशवाईचा अस्त व इंग्रजी राज्याच्या उदयाबरोबर हिंदूस्थानात पाश्चात्य संस्कृतीच्या व पाश्चात्य सुधारणेच्या संगमास प्रारंभ झाला. इंग्रजी राज्याने पाश्चात्य सुधारणेचा पाया तयार केला. ज्या काळात स्त्री, शुद्रातिशुद्र व शेतकऱ्यांना ब्राम्हणशाही व आग्लशाही मुळे गुलामीचे जीवन जगावे लागत होते. म. जोतीबांनी त्या काळातील सामाजिक व धार्मिक भेदांचा धिक्कार करुन समाजात समता, स्वातंत्र्य, लोकशाही, मानवतावाद, विज्ञान या मूल्यांचे बिजारोपण करण्याचे काम केले. या अर्थाने म. फुले हिंदी बहुजन समाजाच्या सामाजिक गुलामगिरींची ओळख असलेले बहुजन समाजाचे आद्य समाजसुधारक ठरतात.

**जातीव्यवस्थेला विरोध :-**

महात्मा फुले जात मानवनिर्मित असल्याचे प्रतिपादन करतात. हिंदू समाजरचना ज्या वर्णपद्धतीवर उभी केली होती तिचे दोन पायाभूत खांब - जातिभेद आणि अस्पृश्यता हे ईश्वर निर्मित आहेत असे सांगून जी फसवणुक केली जात होती तिच मुळात मानवनिर्मित असल्याचे म. फुले विचार व्यक्त करतात. जातीभेद, वर्णभेद, अस्पृश्यता या संबंधीच्या भाकड कथा कशा थोतांड आहेत हे महात्म फुलेंनी शास्त्रीय पद्धतीने दाखवून दिले. याला कारण घडले ते म्हणजे आपल्या एका ब्राम्हण मित्राच्या लग्नाच्या वरातीत ते ब्राम्हणेत्तर असल्याने त्यांचा उपमर्द करण्यात आला त्याचा घाव त्यांच्या जिव्हारी लागला व ते हिंदू धर्माविरुद्ध आणि त्याहीपेक्षा ब्राम्हणशाही विरुद्ध बंड करण्यास उभे राहिले. या घटनेनंतर जोतीरावांनी एकामागून एक स्थापन केलेल्या

संस्था आणि प्रसिद्ध केलेले लिखाण यामुळे बंडाचे एक एक स्फोट होत गेले. सन १८४८ साली त्यांनी मुलींची शाळा काढली. ही पुण्यातील पहिली मुलींची शाळा होय. त्यानंतर दलितांच्या मुलांसाठी त्यांनी शाळा सुरू केली. या दोन्ही शाळेत ते स्वत: व त्यांच्या समाजशील साध्वी पत्नी सावित्रीबाई हे दोघेही काम करीत होते. त्यानंतर त्यांनी कामगारांसाठीही रात्रीची शाळा काढली. सन१८६० साली त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधकगृह' स्थापन केले. सन१८६८ साली आपल्या घरातला पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांना खुला करुन देऊन अजूनही न सुटलेल्या अस्पृश्यता निवारणाच्या समस्येला वाचा फोडली त्यामुळेच स्त्री आणि शुद्र यांच्या उद्धारासाठी जीवाभावाने झटणारे व जिद्दीने लढणारे महात्मा फुले हे पहिले सुधारक ठरले.

**स्त्री स्थिती सुधारणेसाठी प्रयत्न :-**

महात्मा जोतिराव फुले यांनी स्त्री - पुरुष समानतेचा पुरस्कार केला. म. फुले हे कृतीशील व मूलगामी विचार मांडणारे विचारवंत असल्यामुळे समाजातील सर्व शोषीत घटकांबद्दल त्यांना नितांत आदर होता. अस्पृश्यतेबरोबरच त्यांनी स्त्रीयांसाठी सुद्धा शाळा काढल्या. स्त्री - पुरुष संबंधामधील सामाजिक विषमता व त्यातून पुरुषांकडून स्त्रियांना मिळणारी अन्यायाची वागणूक म. फुलेंनी आपल्या लिखाणात व सामाजिक सुधारणेच्या चळवळीत सातत्याने मांडलेली आढळते. महात्मा फुलेंनी विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीस सक्रीय पाठिंबा दिला व त्यात पुढाकारही घेतला. सन १८६४ मध्ये पुण्यात एक पुनर्विवाह घडवून आणला. एखाद्या तरुण विधवा स्त्रीची चुकून गर्भधारणा झालेली असल्यास भ्रूणहत्येशिवाय तिच्यापुढे पर्याय नसे. अशा दुर्दैवी स्त्रियांची सुटका व्हावी. त्यांचे बाळंतपण होवून त्यांची मुले सुरक्षित राहण्यासाठी म. फुले यांनी सन १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधगृह' स्थापन केले व त्यातील मुलांची काळजी घेण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी स्विकारले.

स्त्री शिक्षणाची मोठी चळवळ ज्यांनी स्विकारली ते महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे नाव महाराष्ट्रात वरच्या स्थानावर घेतले जाते. स्त्री ही पुरुषांप्रमाणेच निसर्गदत्त मानवी हक्काचा उपभोग घेण्यास लायक असताना पुरुष संस्कृतीतील निर्बंधांमुळे तिला ते उपभोगता येत नाही हा एक प्रकारचा अन्याय आहे असे त्यांनी ठामपणे सांगितले. स्त्री - पुरुष एकसारखे एकंदर सर्व मानवी अधिकाराचा उपभोग घेण्यास पात्र असताना, स्त्रीयांस एक तऱ्हेचा नियम लागू करणे व पुरुषास दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ पक्षपात होय. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाला हिंदूंच्या निरनिराळ्या धार्मिक रुढीबरोबरच पुरुषांना सुद्धा त्यांनी जबाबदार धरलेले आहे. महात्मा फुलेंना स्त्रियांच्या बाबतीत नितांत आदर होता. सर्व प्राण्यात मानव व मानवात स्त्री श्रेष्ठ अशी त्यांची भूमिका होती.

**शेतकऱ्यांचा असूड :-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्यापासून ते सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकापर्यंत जे गद्य - पद्य लिखाण महात्मा फुलेंनी केले ते त्यांच्या साहित्यिक लेखणीची चमक दाखवतात. शेतकऱ्यांचा असूड या पुस्तकात शेतकऱ्यांच्या कळवळयाने त्यांची नाडणुक आणि नागवणुक करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर हा असूड चालवताना ब्राम्हण सत्ताधाऱ्या प्रमाणेच इंग्रज सत्ताधाऱ्यांचेही जे उपरोधिक वर्णन त्यांनी केलेले आहे ते त्यांना इंग्रजी राज्याच्या रक्तशोषक स्वरुपाची किती चीड आलेली होती याची साक्ष देते.

भारतीय शेतकऱ्यांच्या हलाखीच्या परिस्थितीचे समाजाला व सरकारला विदारक दर्शन घडवून त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे महत्त्वाचे कार्य सर्वप्रथम महात्मा फुलेंनी सन १८८३ मध्ये लिहिलेल्या या ग्रंथाने केले. भारतीय शेतकऱ्यांचे दु:ख त्यांच्या अज्ञानात असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. ब्राम्हण शेतकरी वर्गाला धर्माच्या नावाखाली लुबाडतात. तसेच सरकारी अधिकाऱ्यांची देखील वृत्ती बेपर्वाईची असते. हे

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0023

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

महात्मा फुलेंनी दाखवून दिले. आतापर्यंतच्या एकूण भारताच्या परंपरेत शोषितांचा एवढा गांभीर्याने विचार कोणी केला नव्हता. यातूनच महात्मा फुलेंची शेतकऱ्यांबद्दलची कळकळ व दूरदृष्टी दिसून येते.

शेतकऱ्यांचा असूड हे पुस्तक म. जोतिराव यांनी शुद्र शेतकऱ्यांचे बचावाकरिता केले आहे असे त्या पुस्तकाच्या पहिल्या पानावर त्यांनी नमूद केले आहे. या पुस्तकात एकूण पाच प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात सरकारी सर्व खात्यामध्ये ब्राम्हण कामगारांचे प्राबल्य असल्यामुळे त्यांचे स्वजातीय स्वार्थी भट ब्राम्हण आपल्या मतलबी धर्माच्या अमिषाने अज्ञानी शेतकऱ्यास इतके नाडतात की, त्यास आपली लहान चिटुकली मुले शाळेत पाठविण्याची साधने रहात नाहीत व एखाद्यास तसे साधन असल्यास त्यांच्या दुरुपदेशाने तशी इच्छा होत नाही याबाबत चर्चा केलेली आहे. सरकारी गोरे अधिकारी हे बहुतकरून ऐषआरामात गुंग असल्यामुळेच त्यास शेतकऱ्यांचे वास्तविक स्थितीबद्दल माहिती करून घेण्यापुरती सवड होत नाही व या त्यांच्या गाफीलपणाने एकंदर सर्व सरकारी खात्यात ब्राम्हण कामगारांचे प्राबल्य असते. या दोन्ही कारणांमुळे शेतकरी इतके लुटले जातात की, त्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्रही मिळत नाही. याबाबत सविस्तर लिहिले आहे. दुसऱ्या प्रकरणात तसेच आर्य ब्राम्हण इसमातून कसे आले व शुद्र शेतकरी यांची पूर्वपीठीका व हल्लीचे आमचे सरकार एकंदर सर्व आपले कामगारास मन मानेल तसे पगार व पेन्शने देण्याचे इराद्याने नाना प्रकारचे नित्य नवे कर शेतकऱ्यांचे बोडक्यावर बसवून त्यांचे द्रव्य मोठ्या हिकमतीने गोळा करु लागल्यामुळे शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहेत. त्याचे वास्तव चित्र त्यांनी तिसऱ्या प्रकरणात केलेले आहे. चवथ्या प्रकरणात शेतकऱ्यासहित शेतकीची हल्लीची स्थिती विशद केली असून शुद्र शेतकऱ्यासंबंधी भट ब्राम्हणास सूचना व सांप्रत सरकारने कोणकोणते उपाय योजावेत याबाबत पाचव्या प्रकरणात स्पष्ट केले आहे.

शेतकऱ्यांचे यथोचित वर्णन करताना महात्मा जोतिबा लिहितात, "विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गति गेली, गतीविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले." भारतातील शेतकऱ्यांविषयी महात्मा जोतिबा लिहितात, "जगातील एकंदर सर्व देशांचे इतिहास एकमेकांशी ताडून पाहता हिंदुस्थानातील अज्ञान व देवभोळ्या शुद्र शेतकऱ्यांची स्थिती मात्र इतर देशातील शेतकऱ्यांपेक्षा निकृष्ट अवस्थेस पात्र होऊन केवळ पशूपलीकडे जाऊन पोहचली असे दिसून येईल. महात्मा जोतिबांचे हे मत एकविसाव्या शतकातही जसेच्या तसेच लागू पडते.

**सत्यशोधक समाज :-**

महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाची चळवळ ही मूलत: धार्मिक सुधारणांचा आग्रह धरणारी चळवळ होती. म. फुलेंच्या सत्यशोधक समाजाद्वारे उभारण्यात आलेला लढा सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक गुलामगिरी विरुद्धचा लढा होता. समाजाच्या कनिष्ठ वर्गाचा उद्धार करणे हा त्यांचा उद्देश होता. म्हणून आधुनिक भारतात सामाजिक पूनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली सामाजिक संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. त्याचा मुख्य उद्देश शुद्र आणि अतिशुद्र यांची ब्राम्हणांकडून होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना मानवी हक्काची शिकवण देणे व त्यांची ब्राम्हणशाहीच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करणे ही होती.

सत्यशोधक चळवळीचे परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणात विविध चळवळीवर पडलेले दिसतात. एक तर या चळवळीमुळे बहुजन समाजाचे नेतृत्व उदयास आले. स्वातंत्र्यानंतर बहुजन समाजाच्या हाती सत्तासुत्रे आली. समाजोन्नती साठी शिक्षणाचे महत्व लोकांना पटले असून स्त्रिया, शुद्रातिशुद्र या वर्गापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न होत आहे. कृषी विकासासाठी फुल्यांनी शेतकऱ्यांच्या असूडमध्ये ज्या उपाययोजना सुचविल्या त्याचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न होत आहे. सर्वांसाठी एकच पाणवठा हा संदेश सत्यशोधक चळवळीने दिला. आज एक गांव एक पाणवठा ही मोहीम कार्यान्वित झाली आहे. सत्यशोधक

समाजातून प्रेरणा घेवून मुस्लिम सत्यशोधक समाज कार्यरत झाला आहे. महात्मा फुल्यांच्या साहित्याने व कार्यातून प्रेरणा घेवून दलित साहित्य, दलित चळवळी व वेगवेगळ्या पुरोगामी चळवळी निर्माण झाल्या आहेत.

**निष्कर्ष :-**

महात्मा फुले यांना क्रांतीबा म्हणून ओळखतात. क्रांतीबा म्हणजे क्रांतीचे पितामह. क्रांतदर्शी विचारांचे प्रणेते, कृतिवीर समाजसेवक, ज्या काळात अस्पृश्यांना दास समजत असत, ज्या काळात अस्पृश्यांना माणुसकीने वागवले जात नव्हते अशा काळात क्रांतीबा फुले यांनी अस्पृश्यांना आणि अस्पृश्येतर शुद्रांना सनातन परंपरेविरुद्ध संघटित केले. समाजाला नवी दृष्टी दिली. नवीन विचार दिला. विचार करण्याची पारंपरिक पद्धत बदलली. समाजव्यवस्थेची समीक्षा केली. आपल्या रांगड्या भाषेत त्यांनी धर्मग्रंथांची चिरफाड केली. त्यांचा लढा ब्राम्हण्याविरुद्ध होता. दासशुद्रांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचा होता. हा लढा अधिकाधिक तीव्र व्हावा म्हणून ते धर्मग्रंथ पोथीनिष्ठ विचारांवर घणाघाती हल्ला चढवित होते. त्यांची शैली धोपट होती. तर्कशुद्ध होती. बीनतोड होती. त्यांच्या विचारात जे सौंदर्य होते, त्याचे मूल्यच विलक्षण होते. त्या विचार मूल्यांचा अभ्यास मोकळ्या मनाने केला तर त्यातले गांभीर्य आपल्या लक्षात येईल. त्यांच्या विचारांचे पूनर्मूल्यांकन करताना त्यातले चिरंतनत्व लक्षात येते.

**संदर्भसूची :-**

१) भोळे भा.ल. : महात्मा जोतिराव फुले, भारतीय साहित्याचे निर्माते. साहित्य अकादमी नवी दिल्ली १९९६.

२) डॉ. चौसाळकर अशोक : महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ लोक वाङ्मय गृह, मुंबई १९९०.

३) डॉ. गुंदेकर श्रीराम : महात्मा जोतिबा फुले विचार आणि वाङ्मय प्रतिमा प्रकाशन पुणे १९९२.

४) डॉ. कुसुम पवार - मोरे : महाराष्ट्रातील प्रागतिक विचार प्रवाह आणि महात्मा जोतिराव फुले २०१३.

५) प्रा. जितेंद्र भांबरे : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास २०१५.

६) श्री. अरूण पाटकर : संपादक, लोकराज्य महात्मा फुले स्मृती शताब्दी विशेषांक १९९१.